# प्रसिद्धी विभाग

## २०१३ – २०१४

### अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सासवड

सकाळ पुणे जिल्हा सोमवार, ९ डिसेंबर २०१३ ८



राजगुरुनगर (ता. खेड) : सासवडच्या साहित्य संमेलनाला राजगुरू महाविद्यालयातर्फे अकरा हजार रुपयांचा धनादेश विजय कोलते यांच्याकडे सुपूर्द करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील (डावीकडून पहिले) व ॲड. राम कांडगे (उजवीकडून दुसरे).

## सासवडचे साहित्य संमेलन यशस्वी करा : विजय कोलते

राजगुरुनगर, ता. ८ : सासवड येथे होणाऱ्या ८७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये खेड तालुक्यातील विद्यार्थी व साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संमेलनाचे स्वागताध्यक्ष विजय कोलते यांनी राजगुरुनगर येथे केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये कोलते बोलत होते. संमेलन यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्वांच्या मदतीची गरज असल्याचे कोलते म्हणाले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, माजी आमदार ॲड. राम कांडगे यांच्या हस्ते अकरा हजार रुपयांचा धनादेश कोलते यांच्याकडे देण्यात आला. संचालक शांताराम घुमटकर, शां. ल. घुमटकर, कोंडीभाऊ टाकळकर, साई शिंदे, प्राचार्य एस. बी. पाटील उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख